**प्रेस नोट** दिनांक. १८/१२/२०२४

आरोपी लोकसेवक प्रकाश विठ्ठलराव टाक, वय ४२ वर्षे, पद कनिष्ठ लिपिक अतिरिक्त पदभार दुय्यम निबंधक गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी (वर्ग ३), रा.लोकमान्य नगर, परभणी हे ४,०००/- रुपयांची लाचमागणी प्रकरणी अेसीबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे.गंगाखेड जि.परभणी गुरनं ७८९ /२०२४ कलम ७ भ्र.प्र.अधि १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.१८/१२/२०२४ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | प्रकाश विठ्ठलराव टाक, वय ४२ वर्षे, पद कनिष्ठ लिपिक अतिरिक्त पदभार दुय्यम निबंधक गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी (वर्ग ३), रा.लोकमान्य नगर, परभणी. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रु. मागणी करुन तडजोड अंती ४,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांना गंगाखेड नगर परिषद हद्दीतील प्लॉट खरेदी करणे असल्याने त्यांनी दि. ०३/१२/२०२४ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय गंगाखेड येथे गेले. तेथे तक्रारदार यांनी तेथील हजर आलोसे प्रकाश टाक यांना खरेदीखत करण्यासाठी किती फिस लागेल याची विचारणा केली. आलोसे प्रकाश टाक यांनी ६०००रु ते ७००० रु फीस लागेल व त्या व्यतिरिक्त १००००/- रु लागतील असे तक्रारदार यांना सांगितले. फिस व्यतिरिक्त मागितलेली रक्कम १००००/- रु ही लाच असल्याने ती तक्रारदार यांना द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ०३/१२/२०२४ रोजी एसीबी परभणी येथे तक्रार दिली.<br>दि.०४/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे प्रकाश टाक यांनी तक्रारदार यांना खरेदी करायचे असलेल्या प्लॉट चे खरेदीखत करुन देण्यासाठी ७७००/- रु शासकीय फिस लागेल असे सांगून त्या व्यतिरिक्त इतर ५०००/- रु लाचेची तक्रारदार यांचेकडे मागणी केली. त्यावरुन तक्रारदार यांनी काही तरी कमी करा अशी विनंती केलेवरुन तडजोडी अंती आलोसे प्रकाश टाक यांनी तक्रारदार यांचेकडे ४०००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली वरुन आज दि.१८/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही मा.श्री.संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड, डॉ.संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक लाप्रवि परभणी, श्री.बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी व सपोउपनि निलपत्रेवार, पोह भुमकर,कुलकर्णी,चाटे, पोशि कदम,शेख जिब्राईल, नागरगोजे चापोह कदम,नरवाडे टिम एसीबी परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि परभणी 9850483337 |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| **दुरध्वनी क्रमांक** :– 02452–220597 **टोल फ्री क्रमांक**:– 1064 **ऑनलाईन ॲप** acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner